आतिक्रमण

मिरा-भाईंदर महानगरपालिका
विधी विभाग
आवक क्र. 04 मा.अ
दिनांक 5/2/2018

जा. प्र. 3580
5/2/18
वि. प्रमुख
विधी विभाग

जोडपत्र–अ
(नियम–3)

**<u>केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम–6–अन्वये माहिती मिळविण्यासाठी विनंती अर्ज.</u>**

प्रति,
शासकिय जन माहिती अधिकारी
सामान्य प्रशासन विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प) – 401101.




1) अर्जदाराचे संपूर्ण नाव :– सोहेल मु. खान.

2) संपूर्ण पत्ता :– बी/406, विणा सोसायटी, टेंबा रोड, भाईंदर (प) – 401101.
मोबाईल :– 8286971461.

3) आवश्यक असलेल्या माहितीचा कालावधी :– कार्यालयीन कालावधी पासून ते आज आखेर पर्यंत.

4) माहिती टपालाव्दारे पाहिजे किंवा व्यक्तिशः :– प्रत्यक्ष येउन माहिती घेउन जाणार आहे.

5) अर्जदार दरिद्रय रेषे खालील आहे का? :– नाही.

6) आवश्यक असलेल्या माहितीचा विषय/तपशील/वर्णन/वर्गीकरणः–

आपले सरकार पोर्टल तक्रार क्र. DEPT/URDM/2017/6106 या नमूद संदर्भाधीन दिनांकः– 01/02/2018 रोजी बैठक आयोजीत करण्यात आली होते. नमूद बैठकबाबत तपशीलवार माहिती उपलब्ध करून मिळावी.

ठिकाण :– ठाणे
दिनांकः– 03/02/2018.

सोहेल मु. खान

RIGHT TO INFORMATION

# मिरा भाईंदर महानगरपालिका

जाक्र.मनपा/विधी/ ०५ /२०१८-१९
दि. २३/०४/२०१८

प्रति,

श्री. सोहेल मु. खान
जी/१०६, विणा अपार्टमेंट,
टेंबा रोड, भाईंदर (प)
ठाणे ४०११०१

**विषय :- केंद्र शासनाचा माहिती अधिकार २००५ अन्वये अर्ज.**

**संदर्भ :-** १) आपला दि. ०३/०२/२०८ (प्राप्त दि. ५/४/२०१८) रोजीचा अर्ज.
२) मा. उपायुक्त (मु) यांचे प्रथम अपिलातील निर्णय दि. ०६/४/२०१८

**महोदय,**

संदर्भिय माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये आपण आपले सरकार पोर्टल तक्रार क्र. DEPT/URDM/2017/6106 या नमुद संदर्भाधीन दि. ०१/०२/२०१८ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. नमुद बैठकीबाबत तपशिलवार माहिती अपेक्षिली होती. सदरचे अर्ज विधी विभागास दि. ५/४/२०१८ रोजी प्राप्त झाले आहे. सदर अर्जाच्या अनुशंगाने दि. २२/३/२०१८ रोजी प्रथम अपिल केले होते. सदर अपिलाची दि. ६/४/२०१८ रोजी श्री. विजयकुमार म्हसाळ, प्रथम अपिलिय अधिकारी यांच्याकडे सुनावणी झाली. सदर सुनावणीतील निर्णयानुसार दि. ०१/०२/२०१८ रोजी मोबाईल टॉवर्सबाबत मा. अतिरिक्त आयुक्त यांच्याकडे झालेल्या सुनावणीचा इतिवृत्तांताची प्रत आपणास उपलब्ध करून देण्यात येत आहे.

Svadke

सई वडके
जनमाहिती अधिकारी तथा विधी अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

04/05/18
प्रत मिळाली.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

माहितीचा अधिकार

जा.क्र.मिभामनपा/उपआ.विधी/२६२/२०१८
स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१,
दुरध्वनी क्र.२८१९२८२८, २८१९३०२८
दिनांक:०४/०४/२०१८

सुनावणी दिनांक:-०६/०४/२०१८
वेळ:- दुपारी १२.४५ वाजता

मिरा-भाईंदर महानगरपालिका
विधी विभाग
आवक क्र. ०५ अपिल-१
दिनांक ५।४।२०१८

प्रति,

श्री.सोहेल मु. खान,
बी/४०६, विणा सोसायटी, टेंबा रोड,
भाईंदर (प.) ४०११०१.

विषय:- माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये दाखल प्रथम अपिल
संदर्भ:- आपला दि.२२/०३/२०१८ रोजीचा अपील अर्ज.
(या कार्यालयाकडे प्राप्त दि.०२/०४/२०१८, आ.क्र.५५).

महोदय,

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(१) अन्वये आपण केलेल्या संदर्भाधीन प्रथम अपिलाची सुनावणी, मा.प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सा.प्र.) मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेसमोर खाली दिलेल्या नमुद दिवशी/वेळी आयोजित करण्यात आली आहे.

सुनावणीचा दिनांक व वेळ :- दि.०६/०४/२०१८ रोजी दुपारी १२.४५ वाजता.
ठिकाण :- प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (विधी)
यांचे दालन, तिसरा मजला, स्व.इंदिरा गांधी भवन,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.). ता.जि.ठाणे ४०११०१.

(मा.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (विधी) यांचे निर्देशानुसार)

स्वीय सहाय्यक
Pawar
मा.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (विधी)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत:- मा.जनमाहिती अधिकारी तथा विधी अधिकारी,
मिरा भाईंदर महानगरपालिका, यांना सुनावणीचे दिवशी आवश्यक
त्या कागदपत्रांसह उपस्थित राहणेकामी
(सोबत श्री.सोहेल मु. खान यांच्या संदर्भिय अर्जाची छायांकित प्रत)

५५
उपा मु
2/8/18

जोडपत्र–ब
(नियम–5(1))

केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम–19(1)–अन्वये प्रथम अप्लीय अर्ज.

प्रति,
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (मु.),
सामान्य प्रशासन विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प) – 401101.

1) अर्जदाराचे संपूर्ण नाव :– सोहेल मु. खान.

2) संपूर्ण पत्ता :– बी / 406, विणा सोसायटी, टेंबा रोड, भाईंदर (प) – 401101.
मोबाईल :– 8286971461.

3) संबंधित जन माहिती अधिकाऱ्याचा तपशील :– शासकिय जन माहिती अधिकारी तथा सहा. आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग, मिरा भाईंदा महानगरपालिका, भाईंदर (प).

4) ज्या निर्णय विरूध्द प्रथम अपिल करावयाचे आहे, त्या निर्णय मिळावल्याची तारीख :– निरंक.

5) अपिलाची कारणे :–

दिनांकः–03 / 02 / 2018 रोजी माहितीचा अधिकारांतर्गत माहिती उपलब्ध करून मिळवि––ण्यासाठी विहित नमून्यात मी विनंती अर्ज केलेले आहे. नमूद अर्ज केल्यावर आज आखेर पर्यंत मला कोणत्याही स्वरूपातील माहिती उपलब्ध करून न दिल्याने कलम–7(2)–अन्वये माझा विनंती अर्ज नकारल्याचे मानण्यात येते. तरी माझा विनंती अर्ज का नकारण्यात आले याबाबत स्पष्ट कारणे नमूद करून माहिती उपलब्ध करून मिळावी. तसेच खालील प्रमाणे मी उपस्थित केलेल्या मुद्यांची मुद्देसूद माहिती मिळावी.

अ) माझ्या अर्ज कोणत्या अधिकाऱ्याकडे केव्हा पोहोचला त्या अधिकाऱ्याकडे किती काळ तो अर्ज प्रलंबित राहिला आणि त्याने त्या कालावधी मध्ये काय काम केले (किंवा निर्णय घेतले).

ब) कृपया माझ्या अर्जावर निर्णय केले पाहिजे होते त्या अधिकाऱ्यांची संपर्ण नाव, पद, कार्या––लयीन पत्ता व दुरध्वानी क्रमांकासह माहिती उपलब्ध करून मिळावी. तसेच ज्यांनी निर्णय केले नाही त्या अधिकाऱ्यांची संपूर्ण नाव, पद, कार्यालयीन पत्ता व दुरध्वानी क्रमांकासह माहिती उपलब्ध करून मिळावी.

क) जनतेला त्रास दिल्याबद्दल व जनतेचा काम न केल्या बद्दल त्या दोषी अधिकारी विरूध्द शिस्तभंगाची कार्यवाही केली आहे का? नसल्यास केव्हा करणार?

6) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील :–

अ) आवश्यक असलेल्या माहितीचा विषय व स्वरूप :– जसे आहे तसेच.

ब) आवश्यक असलेल्या माहितीशी संबंधित विभाग किंवा कार्यालय :– सामान्य प्रशासन विभाग.

ठिकाणः–ठाणे
दिनांकः–22 / 03 / 2018

सोहेल मु. खान

दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सा.प्र.)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/०५५/२०१८
दि.०६/०४/२०१८.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सा.प्र.), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.**

श्री.सोहेल मु. खान,
बी/४०६, विणा सोसायटी, टेंबा रोड, ................अपिलार्थी
भाईंदर (प.) ४०११०१.

जनमाहिती अधिकारी तथा,
विधी अधिकारी, विधी विभाग ................प्रतिवाद

## -: विवेचन :-

श्री.सोहेल मु. खान यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा विधी अधिकारी, विधी विभाग यांचेकडे दि.०३/०२/२०१८ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

१) आपले सरकार पोर्टल तक्रार क्र.DEPT/URDM/2017/6106 या नमुद संदर्भाधीन दिनांक ०१/०२/२०१८ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. नमुद बैठकीबाबत तपशिलवार माहिती उपलब्ध करुन मिळावी.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**

माहिती अधिकार अंतर्गत आजपर्यंत माहिती दिली नसल्याने अपिलार्थी अर्जदार यांनी दि.२६/०३/२०१८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (विधी) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी अर्जदार व जनमाहिती अधिकारी तथा विधी अधिकारी, विधी विभाग यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.०६/०४/२०१८ रोजी दुपारी १२.४५ वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/ उपआ.सा.प्र./२६२/२०१८ दि.०४/०४/२०१८ अन्वये कळविण्यात आले आहे. सबब, जनमाहिती अधिकारी तथा विधी अधिकारी, विधी विभाग व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद**:- माझ्या दि.०३/०२/२०१८ रोजीच्या पत्रानुसार माहिती दिली नाही.

२) **जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-** अपिलार्थी अर्जदार यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

## -: **निर्णय** :-

१) जनमाहिती अधिकारी तथा विधी अधिकारी, विधी विभाग यांनी अपिलार्थी अर्जदारास १० दिवसांत विनाशुल्क माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात आले.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (विधी)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति:-

१) श्री.सोहेल मु. खान,
बी/४०६, विणा सोसायटी, टेंबा रोड,
भाईंदर (प.) ४०११०१.

२) जन माहिती अधिकारी तथा
विधी अधिकारी, विधी विभाग

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (विधी) यांचे कार्यालय.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

विधी विभाग
जाक्र.मनपा/विधी/१०१ /२०१७-१८
दि. २३/४/१८

**अतिरिक्त आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत मोबाईल टॉवर विरुद्ध कारवाई करण्यासंदर्भात बैठकीचे इतिवृत्तांत**

दि. ०१/०२/२०१८ रोजी अतिरिक्त आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे अध्यक्षतेखाली दुपारी १२.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत मोबाईल टॉवर्स विरुद्ध कारवाई करण्यासंदर्भात श्री. सोहेल खान यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुशंगाने संयुक्तिक बैठक अतिरिक्त आयुक्त, दालन, मिरा भाईंदर महानगरपालिका येथे बोलविण्यात आली होती. सदर बैठकीस खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी व मोबाईल टॉवरचे प्रतिनिधी उपस्थित होते.

| अ. क्र. | अधिकारी/कर्मचाऱ्याचे व मोबाईल प्रतिनिधींचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | दिपक पुजारी | उप-आयुक्त (अतिक्रमण) |
| २. | विजयकुमार म्हसाळ | उप-आयुक्त (मु) |
| ३. | हे. रा. ठाकुर | नगररचनाकार |
| ४. | सई वडके | विधी अधिकारी |
| ५. | संजय दोंदे | विभाग प्रमुख, अतिक्रमण विभाग |
| ६. | सुदाम गोडसे | प्रभाग अधिकारी, प्रभाग क्र. ०१ |
| ७. | जगदिश भोपतराव | प्रभाग अधिकारी, प्रभाग क्र. ०२ |
| ८. | गोविंद परब | प्रभाग अधिकारी, प्रभाग क्र. ०३ |
| ९. | नरेंद्र चौव्हाण | प्रभाग अधिकारी, प्रभाग क्र. ०५ |
| १०. | जयभवानी टेली. | प्रतिनिधी |

अतिरिक्त आयुक्त यांनी तक्रारदा श्री. सोहेल खान यांच्या तक्रारीच्या अनुशंगाने मोबाईल कंपनीचे प्रतिनिधी तसेच मनपा अधिकारी यांना खालीलप्रमाणे सुचना देण्यात आल्या.

| अ. क्र. | सुचना | अंमलबजावणी करणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्याचे नाव/पद |
|---|---|---|
| १. | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मोबाईल टॉवर्सची यादी नगररचना विभागास उपलब्ध करून देण्यात यावी. | जयभवानी टेली. |
| २. | अ) मोबाईल टॉवर्सच्या परवानगीसाठी प्राप्त अर्जांवर निर्णय घेण्यात यावे. | नगररचना विभाग |

| | | |
|---|---|---|
| | ब) मोबाईल टॉवर्सच्या नियमितीकरणासाठी प्राप्त झालेल्या अर्जांवर मुदतीत निर्णय घेण्यात यावे.<br>क) फेटाळण्यात आलेल्या अर्जांची यादी संबंधित प्रभागास व कर विभागास देण्यात यावी.<br>ड) ज्या मोबाईल टॉवर्सला परवानगी प्राप्त नाही अशा मोबाईल टॉवर्सची यादी प्रभाग अधिकारी यांना देण्यात यावी. | |
| ३. | नगररचना विभागाकडून अनधिकृत मोबाईल टॉवर्सची यादी प्राप्त झाल्यानंतर सदर मोबाईल टॉवर्स विरुद्ध कायदेशिर कारवाई प्रस्तावित करण्यात यावी तसेच मोबाईल टॉवर्सवर केलेल्या कायदेशिर कारवाईची माहिती तक्रारदार श्री. सोहेल खान यांना देण्यात यावी. | सर्व प्रभाग अधिकारी |
| ४. | अ) मोबाईल टॉवर्सच्या थकीत कर आकारणीची रक्कम वसुल करण्याची कारवाई करण्यात यावी.<br>ब) नगररचना विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या यादीनुसार नविन मोबाईल टॉवर्सना कर आकारणी करण्यात यावी.<br>क) विभागात नविन कर आकारणी करणेकरीता प्राप्त अर्जानुसार कर आकारणी करणे. | कर निर्धारक व संकलक |

त्यानंतर सर्व उपस्थितांचे आभार मानल्यानंतर बैठक समाप्त झाली.

माधव कुसेकर

(माधव कुसेकर)
अतिरिक्त आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत :- मा. आयुक्त सो. यांना माहितीस्तव सविनय सादर.

पोच 25/4/2018
लिपिक / स्वीय सहाय्यक
उप-आयुक्त दालन
मिरा भाईंदर महानगरपालिका

25/4/18
उप आयुक्त दालन

मिरा भाईंदर महानगरपालिका
प्रभाग समिती भाईंदर (प.) क्र. 01
25/4/18

पोच 25/4/18
लिपिक

पोच 25/4/18
मिरा भाईंदर महानगरपालिका

पोच
25/04/2018
लिपीक
नगररचना विभाग
मि.भा.म.न.पा.

पोच
दिनांक :- 25/4/18
मिरा भाईंदर महानगरपालिका